# राशिभविष्य - सप्टेंबर, २०१२.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत अधिक मनस्ताप देणारा असा अनुभवास येण्याची दाट शक्यता दिसते. प्रिय जनांपासून दूरत्व येणे, छुप्या शत्रूंचा त्रास, नोकरीत वरिष्ठांचा त्रास, संततीचे आजार,वैवाहिक जीवनातील कटकटी, स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्य, अशा परिस्थितीत बदसल्ला देणारे कुमित्र अशापैकी विविध प्रकारच्या घटनांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. त्यात भर म्हणून आर्थिक समस्या निर्माण होण्याची शक्यताही जाणवते. अशा बिकट प्रसंगी मनावर ताबा ठेवून, संतापावर नियंत्रण ठेवून व अहंकारी स्वभावाला लगाम घालून नम्रतेचे आचरण करूनच विपरीत काळाशी मुकाबला केला पाहिजे.
महिन्याच्या उत्तरार्धात निदान नोकरी-व्यवसायास तरी काळ अनुकुल होईल व मनोनुकुल घटना घडतील असे निश्चित वाटते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शारीरिक कष्ट व दगदगीमुळे उष्णता भडकून या राशीच्या काही मंडळीना उष्णतेचे विकार त्रस्त करतील. काहींना मूळव्याधीसारखे आजार होण्याची शक्यता दिसते. घरीदारी आचरण सतत सावधानतेनेच करा. अपघात भय संभवते. तसेच जलभय, विषभय आहेच. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने सध्या या राशीची मंडळी गुलहौशी व ऐषारामप्रिय झाली असण्याची शक्यता जाणवते. या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने सर्व प्रकारचे आरोग्य सुधारेल व संशोधनात्मक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांकडून शास्त्रीय संशोधनात्मक लेखनकार्य होणे संभवते. तसेच कलाक्षेत्रातील मंडळीना काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या काही भग्यवंतांना मानाचे स्थान, प्रतिष्ठा लाभेल; तर काहींना भूमिलाभ वा धनलाभ होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-गाहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण अन्य नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र अस्थिर परिस्थितीशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता दिसते. असे असले तरी या राशीच्या मानसिक रोग तज्द्न्यांना, वकिलांना, द्रव पदार्थ विक्रेत्यांना, कोळशाच्या व्यापाऱ्यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी मात्र भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. दांपत्यजीवनात जीवनसाथीचे अनारोग्य, मतभेद वा अन्य कारणामुळे सुखसमाधान मिळणे कठिण दिसते. तसेच कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणेही शक्य दिसते. तसेच लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे मैत्रीत सकारण, अकारण वितुष्ट येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध नोकरी-व्यवसाय, कौटुंबिक सुखसमाधान व गृहसौख्य या दृष्टीने अतिशय अनुकुल, धनलाभदायक व प्रसन्नतादायक असा असल्याचा अनुभव येईल. पण मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या, कोणाचे मनाविरुद्ध वागणे, अशापैकी कारणांनी संततिसुखात मात्र बाधा येण्याची दाट शक्यता आहे. जपा. महिन्याच्या

उत्तरार्धात मात्र विविध कारणांनी कुटुंबात त्रास, भांडणे होणे संभवते. त्यामुळे या राशीच्या मंडळीच्या आरोग्यावर परिणाम होणेही संभवते. जपा. या राशीच्या ज्या मंडळींचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे काळ लाभदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मनस्तापदायक घटना घडून या राशीच्या काहीना उष्णताविकारांच्या आजाराला समोरे जावे लागेल.

या राशीच्या ज्या मंडळीना रक्तदाब, हृदयविकार असे आजार असतील त्यांनी अति विचार करू नये व मन सतत शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. शास्त्रीय संशोधन व चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. इतर नोकरी-व्यवसाय असणारांच्या बाबतीत महिन्याचा उत्तरार्ध अस्थिर असाच असेल. अध्यात्मात रस असणाऱ्या या राशीच्या मंडळीना उपासनेद्वारे व सामाजिक कार्य करत असणारांना या महिन्याचा काळ प्रगतिकारक व सुखसमाधानदायक असा सिद्ध होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ कौटुंबिक सुख व गृहसौख्याच्या दृष्टीने मनस्ताप देणारा असाच असण्याची शक्यता जाणवते. पण मन शांत ठेवून विचारपूर्वक आचरण केल्यास गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे घडणाऱ्या मनोनुकुल गोष्टींचा आनंद लुटू शकाल. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाला आलेले नैराश्य अशापैकी कारणामुळे अपेक्षित संततिसुख मिळणे शक्य होईलसे दिसत नाही. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. स्थावरसंबंधी वाद असतील तर ते विकोपास जाणार नाहीत याकडे लक्ष द्यावे. काही मंडळीना राहत्या जागेसंबंधीचा त्रास सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायात मनोनुकुल घटना घडतील. जन्मकुंडलीतील योगानुसार बढती, वेतनवाढ, उच्च पद, मानाचे स्थान अशापैकी काहीतरी आनंददायक घटना घडणे संभवते. पाण्याशी संबंधित नोकरी-व्यवसाय असणारांनी सतत सावध राहावे. जलभय संभवते. तसेच विषभयही संभवते. जपा. शास्त्रीय संशोधन व चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना परदेशगमनाचे योग येतील; तर काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे योग येतील. गुरुच्या अनुकुलतेने या राशीच्या काही मंडळीना विविध मार्गांनी धनलाभ होणे संभवते, तर काही मंडळीना वाहनसुख प्राप्त होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरण्याची शक्यता आहे.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात सर्व प्रकारच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे, असे आवर्जून सांगावेसे वाटते. कारण सततच्या मनस्तापामुळेच शारीरिक उष्णता भडकून अनारोग्य होणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारानी तर मन व बुद्धी सतत शांत ठेवली पाहिजे. काहीना डोळ्याच्या दुखण्याचा आजार त्रस्त करील. अस्वस्थ मनस्थितीत कुसंगतीची भर पडल्यास नको ते घडेल. व त्यामुळे धननाशही होणे शक्य आहे. वाहने नेहमी सावधानतेनेच चालवा. अपघात भय आहेच. एखादी भावंडविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तसेच शनि-मंगळामुळे दुखापत, इजा होणे संभवते. जपा. या राशीच्या युवकांना उत्तम नोकरी वा नवे कार्यक्षेत्र

मिळू शकेल. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वकिली-सल्लागारी व्यवसाय, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शिक्षणक्षेत्र, लोखंड व कोळसा व्यापारी अशा सर्वांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. राहूमुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे शक्य आहे. तसेच महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात स्थावर मालमत्तेबाबत किंवा राहत्या जागेविषयीची समस्या त्रस्त करील. दाम्पत्यजीवनातही अपेक्षित सुखसमाधान मिळणे कठिण दिसते. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व विपरीत काळ सुसह्य होईल. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** शनिदेवांच्या साडेसातीचा काळ आणि त्यात रवि-मंगळ-बुध हे तिन्ही ग्रह प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळीनी मन अगदी शांत ठेवून व अविचारी बुद्धीला लागाम घालून संयम व सहनशीलतेचे आचरण केल्यासच होणारा मनस्ताप सुसह्य होईल व शारीरिक अनारोग्यही फ़ारसे बिघडणार नाही. अकारण श्रम व दगदग केल्यास त्राण नाहीसे होणारा थकवा येईल. जपा. घरीदारी सतत मनाविरुद्ध घटनाच घडत असल्याचा अनुभव येईल. त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकला. श्रद्धेने श्रीहनुमानाची उपासना करा. त्यामुळे मन खंबीर होईल व उत्साह वाढेल; आणि विपरीत परिस्थितीला टक्कर देण्याची क्षमता प्राप्त होईल. नपेक्षा गहरे नैराश्य येऊन उगीचच आपल्याला काही तरी आजार झाला असल्याची भावना प्रबळ होईल. या राशीच्या ज्या मंडळीचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी भागीदारीत संशयाने बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच दांपत्यजीवनातही जीवनसाथीशी मतभेद होणार नाहीत याची काळजी घेतल्यास वैवाहिक जीवनातील सुखशांतीत बिघाड होणार नाही. ज्यांची आध्यात्मिक प्रवृत्ती आहे त्यांना उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, कौटुंबिक सुख लाभेल, व हा विपरीत काळ सुसह्य होईल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीचा शनिदेवांच्या साडेसातीचा काळ चालू आहेच. त्यात हट्टी स्वभाव, मानापमान फ़ार, स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्य यांची भर, काही मंडळींच्या कौटुंबिक कलहांमुळे कुटुंबातील सदस्यांचे झालेले स्थलांतर, अन्य प्रतिकुल घटना अशापैकी कारणांनी या राशीच्या मंडळीना असह्य मनस्ताप सहन करावा लागत असेल. अशा परिस्थितीत या राशीच्या मंडळीचे मन अतिशय भावनाशील झाले असणेही शक्य आहे. पण ज्या मंडळीना अध्यात्मात रस असेल त्यांना उपासनेद्वारे काही प्रमाणात मानसिक शांती मिळू शकेल. केवळ अति विचारात वेळ घालवू नका. डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा त्रास होण्याची शक्यता आहे. काही मंडळीना मुदतीच्या तापाचा त्रास सहन करावा लागेल. पण गूढ संशोधन कार्यात कार्यरत असणारांना मात्र काळ प्रगतीच्या दृष्टीने अनुकुल होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. इतर नोकरी-व्यवसाय असणाऱ्या मंडळीच्या कार्यात मात्र अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. केतूमुळे या राशीच्या काहींना रक्तविकार, काहींना त्वचाविकार तर काहींना मुख-दंतरोगाच्या विकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. अशाही परिस्थितीत ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी कोणास अचानक धनलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर

शिवोपासना अनुकुल होईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींचा शनीच्या साडेसातीचा काळ सुरू झाला आहे. सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना, त्यामुळे होणारा मनस्ताप, त्यात काही जुन्या प्रकरणांचा होणारा त्रास, त्यामुळे येणारे नैराश्य व बिघडणारे आरोग्य अशापैकी विविध कारणांनी बेजार करणाऱ्या काळाशी मुकाबला करावा लागणार आहे. पण शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना या महिन्याचा सर्व काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात अडचणी, मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. शुक्राच्या अनुकुलतेने थोरामोठ्यांची कृपा लाभेल व मनोनुकुल घटना घडेल. या राशीच्या काही मंडळीना कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या उच्च बौद्धिक व कला क्षेत्रात तसेच शास्त्रीय संशोधन क्षेत्रात अभ्यास करत असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. मन व बुद्धी शांत व स्थिर राखून संयम व सहनशीलतेचे आचरण केलेत तर खूपच सुखाचे होईल व घडणारे विपरीत टळून गृहसौख्य लाभेल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने स्नेहसंबंध वा प्रेमसंबंध घट्ट होतील. विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील व संपन्न होतील. या महिन्यात प्रसूतिकाळ असणाऱ्या महिलांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळीना प्रगती व धनलाभ या दृष्टीने या महिन्याचा काळ अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईलसे दिसते. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा गुरु ग्रह नोकरी-व्यवसायात मनोनुकुल घटना घडविण्यास पूरक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला कर्क राशीचा शुक्र अनुकुल असल्यामुळे या राशीच्या काही मंडळीना भूमिलाभ, काहीना धनलाभ तर काहीना मानाचे, प्रतिष्ठेचे स्थान मिळण्याची शक्यताही दिसते. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना प्रगती, यश, अर्थलाभ, प्रतिष्ठा अशापैकी काही प्राप्त होण्याची दाट शक्यता आहे. वकिली, हिशेब, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारे, लोखंडी सामानाचे व्यापारी यांना महिन्याचा उत्तरार्ध विशेष अनुकुल व लाभदायक होईल. इतरांना कष्ट, परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती करून घ्यावी लागेल. नेपच्यूनमुळे या राशीच्या मंडळींचे मन अतिशय भावनाशील झाले असण्याची शक्यता जाणवते. अध्यात्मात विशेष रुचि असणारांना तसेच गूढ संशोधनात रस असणारांना प्रगती करण्यास काळ अनुकुल होईल. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग संभवतात. काही मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही शक्य दिसते. पण गैरसमजाने मैत्रीत वितुष्ट येण्याची दाट शक्यताही नाकारता येत नाही. जपा. मात्र महिन्याच्या पूर्वार्धात जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत विरोधी व प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. काळ प्रतिकुल आहे याची जाणीव ठेवून मनावर संयम ठेवून, सहनशील बनून नम्रतेचे आचरण केलेत तर सर्व सुखाचेच होईल.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात ग्रहमान फ़ारसे अनुकुल नाही, असेच

म्हणावे लागेल. स्वत:चे, जीवनसाथीचे व संततीचे अनारोग्य, नोकरीत वरिष्ठांशी मतभेद, भांडणे, मानहानी, काहींची पदावनती, विविध कारणांनी होणारा मनस्ताप, घरातील वडील मंडळींचा विरोध अशा घरीदारी प्रतिकुल असणाऱ्या परिस्थितीशी मुकाबला करत विपरीत काळाला सामोरे जावे लागणार आहे याची जाणीव ठेवा आणि सतत मनावर संयम ठेवून, अत्यंत सहनशील बनून, जिभेला लगाम घालून नम्रतेचे आचरण करा, असे या राशीच्या मंडळीना आवर्जून सांगावेसे वाटते. अनुकुल असणाऱ्या गुरु ग्रहावर विश्वास ठेवा, श्रीहनुमानाची आणि श्रीगणशाची उपासना करा, त्यामुळे अशा विपरीत काळातही मधून मधून मनाला दिलासा देणाऱ्या घटना घडतील व शरीरमनाचे आरोग्य फ़ारसे बिघडणार नाही. या राशीच्या स्वतंत्र व्यवसाय करत असणाऱ्या मंडळींच्या व्यवसायात अडचणी येण्याची व खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. नोकरी कोणतीही असो, कामाचा ताण सहन करावा लागेल. वाममार्ग धनाचा मोह टाळाच.तसेच जुगार, लॉटरीच्या मोहात अडकू नका. दिनांक १९-२० व दिनांक २४-२५-२६ या पाच दिवशी मानसिक दृष्ट्या काही अनुकुल/प्रतिकुल घडण्याची दाट शक्यता दिसते. तसा अनुभव आल्यास कळवा. महिन्याच्या अखेरच्या तीन दिवसांत जन्मकुंडलीतील योगानुसार विविध प्रकारच्या सुखद घटना घडतील. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रातील मंडळीना मात्र काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. परदेशगमन योग येण्याची शक्यता आहे.

(**११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल झाले असले पाहिजे. तसे असेल तर थोडेही मनाविरुद्ध घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे. अशा परिस्थितीत या राशीच्या मंडळींच्या वर्तमान अस्थिर, चंचल स्वभावामुळे, अविचारी आचरणामुळे, जिभेला लगाम घातला जात नसेल तर असह्य मनस्ताप सहन करावा लागत असेल. गुरु ग्रह कौटुंबिक व गृहसौख्य देण्यास अनुकुल आहे; पण कोणाशी पटवून न घेण्याच्या वर्तमान स्वभावामुळेच याना सुखसमाधान लाभत नसेल. नोकरी-व्यवसायास काळ अनुकुल होईल. काही मंडळीना बढती, अधिकारपद असे काही मिळणेही संभवते. कलाक्षेत्रातील मंडळीना काल अनुकुल व प्रगतिकारक होईल, पण मन व वुद्धीवर नियंत्रण ठेवूनच आचरण झाले पाहिजे. या राशीच्या मंडळीना सध्या आरोग्यविषयक समस्याही अस्वस्थ करीत असतील. अपचन, पोटविकार, मूत्राशयविकार अशापैकी कसला तरी त्रास बेजार करत असेल. काही मंडळीना ताप येणे, कसल्या तरी भयावह गोष्टीचा असह्य त्रास होणे अशापैकी शारीरिक-मानसिक आजार होणे संभवते. दूरच्या प्रवासाचे योगही संभवतात; पण प्रवासात मनस्ताप होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या नोकरदार मंडळीना कामाचा ताण सहन करावा लागेलसे दिसते. शिवाय वरिष्ठांशी वाद, भांडण, मतभेद होणेही शक्य आहे. जपा. या राशीच्या व्यापारी मंडळीना मात्र हा सप्ताह लाभदायक होईल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अतिशय चंचल, लहरी, धाक, दडपण सहन न होणारा असा झाला असण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थितीत मानसिक व्यग्रता, चिंता आदिमुळे मनाविरुद्ध थोडेही काही घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असले पाहिजे. या राशीच्या वैचारिक लेखनाची आवड असणारांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होण्यास काळ अनुकुल आहे.

बंधुवर्गाकडून होणारा मनस्ताप व दु:ख यातून दिलासा मिळावा यासाठी या राशीच्या मंडळीनी आध्यात्मिक उपासनेचा अवलंब करावाच, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल पण त्यासाठी होणारी घरगुती भांडणे विकोपाला जाणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल. . कलाक्षेत्रातील मंडळींना प्रगती व यश लाभण्यास काळ अनुकुल होईल. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल व मनोनुकुल घटना घडतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात मात्र आरोग्यविषयक समस्यांनी त्रस्त व्हाल. ताप, अपचन, पोटाचे विकार, अन्य उष्णताविकार अशापैकी आजाराशी मुकाबला करावा लागेलसे दिसते. जपा. या राशीच्या काही मंडळीना महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात प्रवासाचे योग येतील; पण प्रवासात त्रास व मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना व बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पारयण करावे.

-----ooooo-----